## B.A.B.Ed. (Semester – VI and VIII) Examination, April/May 2019
## MARATHI (Paper – X)
## प्रसारमाध्यमांसाठीची लेखनकला
## (Writing Skills For Media)

वेल : २ तास

गुण : ७०

*सूचना : उत्तरपत्रिकेत कोणत्याही ठिकाणी आपल्या नावाचा उल्लेख करू नये.*

१. खालीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : १५

१) ग्रंथ परीक्षणाची उपयुक्तता सांगा.

२) नाट्यपरीक्षणाचे महत्त्व सांगा.

३) चित्रपटाचे घटक कोणते ?

४) वर्तमानपत्रातील 'वाचकांचा पत्रव्यवहार' सदरासाठी लिहिल्या जाणाऱ्या पत्राची रचना कशी असते ?

५) मुद्रितशोधनासाठी वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही आठ खुणा सांगून त्यांचा अर्थ सांगा.

२. खालीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : १५

१) मासिकाच्या शीर्षकपृष्ठावर आवश्यक असणारे घटक कोणते ?

२) संपादकाच्या अंगी कोणते गुण असावेत ?

३) भाषांतर म्हणजे काय ते सांगून भाषांतराचे प्रकार लिहा.

४) पटकथालेखनाचे घटक कोणते ?

५) भाषांतरामुळे कोणकोणते फायदे होतात ?

३. तुम्ही वाचलेल्या (बी.ए.अभ्यासक्रमाव्यतिरिक्त) कोणत्याही एका ग्रंथाचे परीक्षण लिहा. १०

**किंवा**

तुम्ही पाहिलेल्या कोणत्याही एका मराठी चित्रपटाचे परीक्षण लिहा.

४. अ) गोव्यातील कचरा समस्येच्या निवारणासंदर्भात नागरीकांना आवाहन करणारे पत्र 'वाचकांचा पत्रव्यवहार' दैनिक 'भास्कर' मधून प्रसिद्ध करण्यासाठी तयार करा. ५

किंवा

तुमच्या गावातील रहदारीचा रस्ता खराब आहे; त्याच्या दुरूस्ती व डांबरीकरणासंदर्भातील पत्र 'वाचकांचा पत्रव्यवहार' या सदरासाठी तयार करा.

ब) पुढे दिलेल्या मूळ उताऱ्याचे आधारे त्याखालील मुद्रित उताऱ्याचे मुद्रितशोधन करा. ५

मूळ उतारा

घरी आल्यावर काका म्हणाले. "बरं केलांस रे तू कीर्तन. जमेल तुला. में म्हणतच सलो नी तुला नि बाबलला, दोघांनाय कीर्तनां जमतील, म्हणी ? माझे मनात सलांच रे तुमाला कीर्तन, प्रवचन करेवे शिकवेचां. पण रामाचे मनात नाय खरां."

मुद्रित उतारा

घरी आल्यवर काक म्हणाले. "बरां केलांस रेतू किर्तन. जमेल तुला. मे म्हणतच आसलो नि बाबलला, दोघां नाय कीर्तना जमतील म्हणी. माजे मनात सलाच रे तुम्हाला कीर्तन, प्रवचन करवे शीकवेचं. पण रामचे मना त नाय खरां."

५. अ) 'आयुष्यमान' या आरोग्य विषयक विशेषांकाचे शीर्षकपृष्ठ अनुक्रमणिकेसह तयार करा. १०

किंवा

ब) पुढील कथानकाच्या आधारे पटकथा लिहा.

समुद्र किनाऱ्यावर छोटसे हॉटेल चालवत उदरनिर्वाह करणाऱ्या रामरावांना ड्रग्स विकणारा दलाल भेटतो. पैशाचे आमिष दाखवून तो त्यांना ड्रग्सच्या जाळ्यात ओढतो. रामराव लवकरच पैसेवाला होतो. कॉलेजमधील तरूण मुले त्याच्याकडून ड्रग्स विकत घेऊ लागतात. एक दिवस त्यांच्या तरूण मुलाच्या टेबलच्या ड्रॉवरमध्ये त्यांना त्यांच्याच दुकानातून विकली गेलेली ड्रग्सची पुडी मिळते. त्यांना प्रचंड धक्का बसतो. ते रडू लागतात.

६. पुढील **इंग्रजी** उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा. १०

We live in as age when we have forgotten what life is all about. We can easily put a person on the moon but we have trouble walking across the street to meet a new neighbor. We can fire a missile across the world with the pinpoint accuracy, but we have trouble keeping a date with our children to go to the library. We have e-mail, fax and digital phones so that we can stay connected and yet. We live in a time where human beings have never been less connected. We have lost touch with our humanity. We have lost touch with our purpose. We have lost sight of the things that matter the most.

---